# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
**Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik**

सर्व्हे नं.६४८/ब २, फा. प्लॉट नं. ३११ पै., जैन मंदिराजवळ, राका कॉलनी,
नाशिक – ४२२ ००२ (दूरध्वनी : ०२५३-२९५९७८७) email : nmrda.nsk@gmail.com


## जाहीर सूचना.

स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest – EOI)

प्रस्तावित नाशिक रिंग रोड व इतर विकसनक्षम परिसरातील नियोजित नागरी व आर्थिक विकासासाठी नगर रचना योजनेच्या माध्यमातून विकसनासाठी क्षेत्राची धोरणात्मक स्वारस्य (Expression of Interest) व्यक्त करणेबाबत.

EOI क्र. जा. क्र. नामप्रविप्रा / प्रा. नरयो./ स्वारस्य अभि./ , दि. . .२०२६.

**१. पार्श्वभूमी.**

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA) हे नाशिक महानगर प्रदेशासाठी नियोजन व विकास प्राधिकरण असून, महानगर प्रदेशाचा नियोजित, समन्वित व शाश्वत विकास सुनिश्चित करण्याची जबाबदारी प्राधिकरणाची आहे. प्रस्तावित नाशिक रिंग रोडमुळे महानगर प्रदेशातील संपर्कक्षमता मोठ्या प्रमाणात वाढण्याची तसेच रिंग रोडच्या परिसरात नियोजित नागरी, औद्योगिक, संस्थात्मक, आरोग्य, आदरातिथ्य व इतर आर्थिक उपक्रमांच्या विकासासाठी नवीन संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर, NMRDA च्या अधिकारक्षेत्रातील प्रस्तावित नाशिक रिंग रोडच्या व इतर विकसनक्षम परिसरातील मोठ्या व सलग भूखंडांची / परस्पर संलग्न भूखंडांच्या समूहांची, नियोजित विकासाच्या दृष्टीने संभाव्यता ओळखण्याचा निश्चित करण्याचा NMRDA चा मानस आहे. त्या अनुषंगाने, पात्र जमीनमालक / जमीनमालकांचे समूह यांच्याकडून अशा भूखंडांच्या निश्चितीसाठी स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest – EOI) मागविण्यात येत आहेत.

**२. स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest – EOI) चा उद्देश पुढीलप्रमाणे आहे :-**

I. नियोजित नागरी व आर्थिक विकासासाठी संभाव्य असलेल्या मोठ्या व सलग भूखंडांची निश्चिती करणे.

II. प्रस्तावित नाशिक रिंग रोडमुळे प्रभावित होणाऱ्या परिसरातील जमीनमालकांच्या विकासविषयक अपेक्षा व नियोजित विकासामध्ये सहभागी होण्याची त्यांची इच्छा जाणून घेणे.

III. औद्योगिक (Industrial), आरोग्यसेवा (Health), आदरातिथ्य (Tourism), निवासी (Residential), संस्थात्मक (Institutional) व मिश्र (Mix use) वापराच्या विकासासाठी धोरणात्मकदृष्ट्या योग्य संभाव्य ठिकाणे निश्चित करणे.

IV. संभाव्य धोरणात्मक विकास क्षेत्रांचा GIS-आधारित डेटाबेस(Geographical information system based database) तयार करणे. आणि,

V. प्राप्त माहितीच्या आधारे NMRDA मार्फत पुढील नियोजन व तांत्रिक मूल्यांकन करणे आणि, जेथे योग्य व कायदेशीरदृष्ट्या अनुज्ञेय असेल अशा ठिकाणी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ तसेच लागू नियम, विनियम व नियोजन तरतुदींनुसार Town Planning Scheme किंवा इतर योग्य नियोजन हस्तक्षेपासाठी संभाव्य क्षेत्रांचा विचार करणे.

**३. भौगोलिक क्षेत्र.**

सदरची प्रसिध्द स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) प्रस्तावित नाशिक रिंग रोडच्या परिसरात व NMRDA च्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या विकसनशील क्षेत्रासाठी / भूखंडासाठी लागू राहील. या Expression of Interest अंतर्गत विचारात घेतले जाणारे सूचक क्षेत्र रिंग रोड प्रभाव क्षेत्र / Expression of Interest क्षेत्राचा नकाशा, जो या सूचनेस जोडलेला असेल आणि/किंवा नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (NMRDA) संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, त्यानुसार राहील. प्रस्तावित रिंग रोडची आखणी, संपर्कक्षमता, विद्यमान विकासाची रचना, वैधानिक नियोजन तरतुदी व इतर संबंधित बाबींच्या आधारे नियोजन मूल्यांकनासाठी सदर क्षेत्र निश्चित, सुधारित किंवा अधिक स्पष्ट करण्याचा अधिकार नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (NMRDA) राहील.

**४. पात्र भूखंड.**

सर्वसमावेशक व एकात्मिक नियोजनास चालना देणारे मोठे व सलग भूखंड ओळखणे व त्यांची निश्चिती करणे हा या Expression of Interest चा उद्देश आहे. प्रस्तावित विकासाच्या प्रकारानुसार किमान सलग क्षेत्रफळ पुढीलप्रमाणे राहील :-

| प्रस्तावित विकासाचा प्रकार | किमान सलग क्षेत्रफळ |
|---|---|
| औद्योगिक / लॉजिस्टिक्स विकास | १०० एकर |
| आरोग्यसेवा / वैद्यकीय विकास | ५० एकर |
| आदरातिथ्य / पर्यटन विकास | ५० एकर |
| निवासी विकास | ५० एकर |
| मिश्र वापर / एकात्मिक विकास | ५० एकर |
| संस्थात्मक / शैक्षणिक विकास | ५० एकर |

वेगवेगळ्या Gut / Survey क्रमांकांवरील व वेगवेगळ्या जमीनमालकांच्या मालकीचे परस्पर संलग्न भूखंड एकत्रितपणे Expression of Interest अंतर्गत प्रस्तावित करता येतील. तथापि, सदर भूखंड सलग किंवा लक्षणीय प्रमाणात सलग नियोजन क्षेत्र तयार करणारे असणे आवश्यक आहे आणि संबंधित किमान क्षेत्रफळाची अट पूर्ण करणे आवश्यक राहील.

सर्वसमावेशक पायाभूत सुविधा व एकात्मिक विकासाची अधिक क्षमता असलेल्या मोठ्या भूखंडांच्या प्रस्तावांना NMRDA कडून नियोजन मूल्यांकनाच्या वेळी योग्य ते महत्त्व दिले जाऊ शकते.

**<u>५. पात्र अर्जदार.</u>**

खालीलप्रमाणे नमूद केलेल्या व्यक्ती / संस्था Expression of Interest सादर करू शकतात :

१. वैयक्तिक जमीन मालक.

२. संलग्न / सलग भूखंड संयुक्तपणे प्रस्तावित करणारे जमीनमालकांचे समूह.

३. नोंदणीकृत जमीनमालक संघटना किंवा त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्था.

४. जमीनमालकांच्या समूहाचा अधिकृत प्रतिनिधी आणि

५. संबंधित जमिनीची मालकी असलेल्या कायदेशीर संस्था.

एकापेक्षा अधिक जमीनमालकांच्या वतीने भूखंड प्रस्तावित केला असल्यास, अर्जदाराने सहभागी जमीनमालकांच्या मालकी हक्काचे दस्तऐवज तसेच त्यांच्याकडून प्राप्त अधिकृत प्राधिकरणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**<u>६. जमीनमालकांची इच्छा / संमती.</u>**

एकापेक्षा अधिक जमीनमालकांचा समावेश असलेल्या भूखंडाच्या बाबतीत, प्रस्तावित एकूण क्षेत्रफळापैकी किमान ८०% क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जमीनमालकांनी प्रस्तावित नियोजन हस्तक्षेपामध्ये सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केलेली असणे आवश्यक आहे. ८०% ची अट जमीनमालकांच्या संख्येवर नव्हे, तर प्रस्तावित एकूण भूक्षेत्राच्या प्रमाणावर आधारित असेल.

EOI सादर करणे म्हणजे संबंधित जमीनमालकांनी त्यांची जमीन भविष्यातील नियोजित विकासासाठी / Town Planning Scheme किंवा इतर योग्य नियोजन हस्तक्षेपासाठी विचारात घेण्यास आपली इच्छा दर्शविणे होय. तथापि, Expression of Interest सादर केल्यामुळे जमीन हस्तांतरण होणार नाही तसेच NMRDA किंवा जमीनमालकावर कोणतीही कायदेशीर बंधनकारक जबाबदारी निर्माण होणार नाही.

७. विकासाचे क्षेत्र / प्रकार

जमीनमालक खालीलपैकी एक किंवा अधिक प्रस्तावित विकास प्रकारांसाठी आपले प्राधान्य दर्शवू शकतात :

* औद्योगिक व उत्पादन क्षेत्र.
* लॉजिस्टिक्स व वेअरहाऊसिंग.
* आरोग्यसेवा / रुग्णालये / वैद्यकीय संस्था.
* आदरातिथ्य, पर्यटन व संबंधित उपक्रम.
* निवासी विकास.
* मिश्र वापराचा विकास.
* संस्थात्मक / शैक्षणिक विकास.

* व्यावसायिक विकास.
* एकात्मिक नागरी विकास आणि
* इतर धोरणात्मक आर्थिक किंवा नागरी विकासाचे उपयोग.

अर्जदाराने दर्शविलेला प्रस्तावित विकासाचा प्रकार हा केवळ विकासाची इच्छा / अपेक्षा म्हणून विचारात घेतला जाईल. त्यावरून कोणत्याही प्रकारे क्षेत्राचे झोनिंग, भू-वापर, विकास परवानगी किंवा प्रस्तावित वापरास मान्यता देण्यात आल्याचे समजले जाणार नाही.

**८. अर्जदारांनी सादर करावयाची माहिती.**

अर्जदारांनी विहित नमुन्यात पुढील माहिती सादर करावी.

**I. जमिनीचा तपशील. (Details of land under Expression of Interest)**

१. गावाचे नाव व तालुका.

३. जमिनीचा गट नं. / सर्व्हे नं. /सि. न. नं.

४. प्रत्येक गट नं. / सर्व्हे नं. /सि. न. नं. क्षेत्रफळ.

५. प्रस्तावित Expression of Interest खालील एकूण क्षेत्रफळ.

६. विद्यमान जमीन मालकीचा तपशील.

७. जमिनीचे स्वरूप व tenure.

८. विद्यमान भू-वापर / अस्तित्वातील विकास.

९. Expression of Interest खालील क्षेत्रातील लागू असल्यास विद्यमान विकास परवानग्या, न्यायालयीन वाद, बोजे / encumbrances किंवा इतर संबंधित बाबींचा तपशील.

**II. भौतिक व पायाभूत सुविधा तपशील. (Infrastructure & Physical facilities)**

१. विद्यमान रस्ता जोडणी.

२. प्रस्तावित रिंग रोडपासूनचे अंदाजे अंतर.

३. परिसरातील विद्यमान रस्ते / महामार्ग.

४. विद्यमान विद्युत पायाभूत सुविधा.

५. विद्यमान पाणीपुरवठा / पाण्याचे स्त्रोत.

६. विद्यमान जलनिस्सारण / मलनिस्सारण सुविधा, असल्यास.

७. भूखंडाच्या सभोवतालचा विद्यमान विकास.

८. इतर संबंधित पायाभूत सुविधा.

**III. विकास प्रस्ताव. (Development Proposals)**

१. प्रस्तावित विकासाचे प्राधान्य क्षेत्र.

२. प्रस्तावित विकासाचे संक्षिप्त वर्णन.

३. उपलब्ध असल्यास विकासाची संकल्पना / आराखडा.

४. अपेक्षित विकासाचा आकार / स्वरूप.

५. भूखंडाचे कोणतेही विशेष भौगोलिक / स्थानिक फायदे.

**IV. जमीनमालकांचा तपशील. (Details of Land Owners)**

१. एकूण जमीनमालकांची संख्या.

२. सहभागी जमीनमालकांची संख्या.

३. सहभागी जमीनमालकांनी प्रतिनिधित्व केलेले एकूण क्षेत्रफळ.

४. प्रतिनिधित्व केलेल्या क्षेत्रफळाची टक्केवारी.

५. लागू असल्यास अधिकृत प्रतिनिधीचा तपशील.

६. भविष्यातील नियोजन प्रक्रियेत सहभागी होण्याबाबत घोषणा.

**९. Geographic Information System based / अवकाशीय माहिती सादरीकरण.**

वैज्ञानिक व GIS-आधारित मूल्यांकन सुलभ करण्यासाठी अर्जदारांनी प्रस्तावित भूखंडाची सीमा KML/KMZ किंवा इतर GIS-सुसंगत डिजिटल स्वरूपात, तसेच स्थानदर्शक नकाशासह सादर करणे अपेक्षित आहे. डिजिटल स्वरूपात सादर केलेली भूखंडाची सीमा संबंधित Gut / Survey क्रमांकांशी अचूकपणे जुळणारी असावी. एकापेक्षा अधिक भूखंडांचा प्रस्ताव असल्यास अर्जदाराने पुढील माहिती सादर करावी :-

I. प्रत्येक भूखंडाची स्वतंत्र सीमा (Boundary of Individual land parcel ) आणि

II. प्रस्तावित सलग नियोजन क्षेत्राची एकत्रित सीमा. (Total boundary of Contiguous Planning Area )

सादर केलेल्या अवकाशीय माहितीची पडताळणी उपलब्ध नकाशे, उपग्रह प्रतिमा, महसूल अभिलेख व इतर अधिकृत माहितीच्या आधारे स्वतंत्रपणे करण्याचा अधिकार नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा कडे (NMRDA) राहील.

**१०. जोडावयाची कागदपत्रे.**

अर्जदारांनी, लागू असल्याप्रमाणे, पुढील कागदपत्रे सादर करावीत.

I. मालकी हक्क / title documents.

II. अद्ययावत ७/१२ उतारे / मालमत्ता अभिलेख.

III. फेरफार नोंदी / संबंधित महसूल अभिलेख.

IV. सहभागी जमीनमालकांचे अधिकृत प्राधिकारपत्र (Authority letter / GPA of Land Owner)

V. सहभागी जमीनमालकांची संमती / इच्छापत्रे. (Consent of Land Owners).

VI. स्थान नकाशा. (Location Plan/ Map)

VII. GIS / KML / KMZ फाईल ;

VIII. नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (NMRDA) आवश्यक वाटणारी इतर कागदपत्रे.

आवश्यकतेनुसार नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (NMRDA) अतिरिक्त माहिती किंवा स्पष्टीकरण मागविले जाऊ शकते.

**११. मूल्यांकन व नियोजन परीक्षण.**

अर्जदारांनी त्यांचे क्षेत्रासाठी Expression of Interest सादर केल्याने संबंधित भूखंडाची Town Planning Scheme साठी आपोआप निवड होणार नाही. प्राप्त प्रस्तावांचे स्वतंत्र नियोजन व तांत्रिक मूल्यांकन नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत (NMRDA) करण्यात येईल. मूल्यांकन करतांना इतर बाबींसह, पुढील बाबींचा विचार केला जाऊ शकतो.

I. धोरणात्मक स्थान. (Strategic Location)
II. नाशिक रिंग रोडशी जवळीक व संपर्कक्षमता. (Connectivity to Nashik outer Ring road)
III. विद्यमान व प्रस्तावित रस्ते जाळ्याशी जोडणी. (Existing & Proposed roads)
IV. भूखंडाचे क्षेत्रफळ व सलगता. (Total area & Contiguity)
V. जमीनमालकीची रचना व जमीनमालकांची इच्छा.
VI. लागू प्रादेशिक आराखडा व इतर वैधानिक नियोजन तरतुदींशी सुसंगतता. (Proposals of Existing Plan Proposals & applicability as per legal constraints)
VII. विद्यमान व प्रस्तावित पायाभूत सुविधा. (Existing & proposed Infrastructure facilities)
VIII. पर्यावरणीय व भौतिक मर्यादा. (Environmental & Physical constraints)
IX. विद्यमान विकासाची रचना. (Existing Development structure)
X. सर्वसमावेशक व एकात्मिक विकासाची क्षमता. (Accommodation & Integrated Development Potential)
XI. आर्थिक व रोजगारनिर्मितीची क्षमता. (Economical & Employment generation Potential)
XII. नियोजित नागरीकरणास सहाय्य करण्याची क्षमता ;
XIII. पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची व्यवहार्यता ; आणि
XIV. Town Planning Scheme किंवा इतर योग्य नियोजन हस्तक्षेपासाठी क्षेत्राची उपयुक्तता.

वरील मूल्यांकनाच्या आधारे NMRDA एक किंवा अधिक क्षेत्रांची पुढील सविस्तर अभ्यासासाठी निवड करू शकते.

**१२. पुढील नियोजन प्रक्रिया.**

प्राप्त प्रस्तावांच्या मूल्यांकनाच्या आधारे नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA) आवश्यकतेनुसार पुढील अभ्यास, सल्लामसलत व नियोजन प्रक्रिया राबवू शकते आणि योग्य वाटल्यास, लागू कायद्यानुसार Town Planning Scheme तयार करण्यासाठी वैधानिक कार्यवाही सुरू करू शकते किंवा उपलब्ध इतर योग्य नियोजन यंत्रणेचा अवलंब करू शकते.

भविष्यात Town Planning Scheme सुरू केल्यास ती कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६, लागू नियम, विनियम, मंजूर नियोजन तरतुदी तसेच सक्षम प्राधिकरणाच्या निर्देश / मान्यतेनुसार स्वतंत्रपणे व काटेकोरपणे करण्यात येईल. ही EOI महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० अंतर्गत Town Planning Scheme करण्याच्या हेतूची घोषणा ( Declaration of Intention ) म्हणून समजली जाणार नाही.

**१३. विकास हक्क नाहीत / कोणतीही हमी नाही.**

अर्जदारांनी त्यांचे क्षेत्रासाठी Expression of Interest सादर केल्यामुळे अर्जदार किंवा जमीनमालकास पुढीलपैकी कोणताही हक्क, स्वारस्य किंवा अधिकार प्राप्त होणार नाही.

I. भू-वापरातील बदल ;

II. झोनिंग ;

III. विकास परवानगी ;

IV. बांधकाम परवानगी ;

V. FSI / विकास क्षमता ;

VI. Town Planning Scheme मध्ये समावेश ;

VII.आरक्षण किंवा भूखंड वाटप ;

VIII.जमीन संपादन किंवा वाटप किंवा

IX. इतर कोणतीही वैधानिक मान्यता.

तसेच, भविष्यातील कोणत्याही नियोजन हस्तक्षेपाच्या अपेक्षेने अर्जदाराने केलेल्या खर्चासाठी NMRDA कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. ही EOI केवळ माहिती प्राप्त करणे, जमीनमालकांची नियोजन प्रक्रियेत सहभागी होण्याची इच्छा जाणून घेणे आणि नियोजित विकासासाठी संभाव्य क्षेत्रांची ओळख करणे या उद्देशाने आहे.

**१४. कोणतीही आर्थिक बांधिलकी नाही.**

सदरची प्रसिध्द केलेली Expression of Interest ही निविदा, बोली, लिलाव किंवा खरेदी प्रक्रिया नाही. त्यामुळे Expression of Interest सादर करण्यासाठी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा कडून (NMRDA) कोणतीही आर्थिक रक्कम देय राहणार नाही. अर्जदारांना Expression of Interest सादर करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. Expression of Interest सादर केल्यामुळे कोणत्याही जमीनमालकास कोणतीही नुकसानभरपाई, खर्चाची परतफेड किंवा अन्य आर्थिक लाभ मिळण्याचा / मागण्याचा अधिकार राहणार नाही.

**१५. जमिनीचे हस्तांतरण नाही.**

अर्जदारांनी त्यांचे क्षेत्रासाठी Expression of Interest सादर केल्यामुळे नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA) किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावे तत्काळ जमीन

हस्तांतरण, विक्री, भाडेपट्टा किंवा conveyance करण्याची आवश्यकता राहणार नाही. भविष्यात सुरू करण्यात आलेल्या कोणत्याही नियोजन योजनेमुळे जमीन पुनर्रचना, आरक्षण, वाटप, विकास, संपादन किंवा इतर कोणतेही वैधानिक परिणाम उद्भवल्यास ते केवळ लागू असलेल्या वैधानिक तरतुदींनुसार व संबंधित योजनेनुसार नियंत्रित केले जातील.

**१६. Expression of Interest सादर करण्याची पद्धत.**

Expression of Interest, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत ( NMRDA ) उपलब्ध करून देण्यात आलेल्या निर्धारित ऑनलाइन प्रणालीद्वारे सादर करता येईल. विहित Expression of Interest I नमुना व GIS सादरीकरणासंबंधी सूचना नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (NMRDA) संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. अर्जदारांनी सादर केलेली सर्व माहिती पूर्ण व अचूक असल्याची खात्री करावी. महसूल अभिलेख, नियोजन अभिलेख, उपग्रह प्रतिमा, GIS माहिती व इतर अधिकृत स्रोतांच्या आधारे सादर माहितीची पडताळणी करण्याचा अधिकार नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (NMRDA) राहील.

**१७. कालमर्यादा.**

Expression of Interest प्रसिद्ध करण्याची तारीख _____

Expression of Interest सादरीकरणास प्रारंभ _____

Expression of Interest सादर करण्याची अंतिम तारीख _____

प्रारंभिक Expression of Interest सादर करण्याचा कालावधी प्रसिद्धीच्या दिनांकापासून ४५ दिवस, मुदतवाढ आवश्यक असल्यास कमाल अतिरिक्त १५ दिवस, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (NMRDA) आवश्यक वाटल्यास सादरीकरणाची मुदत कमाल १५ दिवसांनी वाढविण्याचा किंवा योग्य सूचना प्रसिद्ध करून वेळापत्रकात बदल करण्याचा अधिकार राहील.

**१८. सर्वसाधारण अटी.**

I. कोणतीही Expression of Interest किंवा प्राप्त माहिती स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार NMRDA कडे राहील आणि त्यासाठी कारण देणे बंधनकारक राहणार नाही.

II. NMRDA कोणत्याही अर्जदाराकडून स्पष्टीकरण किंवा अतिरिक्त माहिती मागवू शकते.

III. NMRDA प्रत्यक्ष स्थळ पाहणी, सर्वेक्षण व सादर माहितीची स्वतंत्र पडताळणी करू शकते.

IV. नियोजन मूल्यांकनासाठी NMRDA विविध अर्जदारांनी सादर केलेले संलग्न प्रस्ताव एकत्रितपणे विचारात घेऊ शकते.

V. वैधानिक निर्बंध, पर्यावरणीय अडचणी, विद्यमान आरक्षणे, पायाभूत सुविधा प्रस्ताव किंवा इतर नियोजनविषयक कारणांमुळे प्रभावित भूखंड NMRDA विचारातून वगळू शकते.

VI. अर्जदाराने दर्शविलेला विकासाचा प्रकार अंतिमतः योग्य नसला तरी NMRDA संबंधित प्रस्तावाचा इतर योग्य नियोजनाच्या दृष्टीने विचार करू शकते.

VII. प्राप्त माहितीचा वापर NMRDA कडून अवकाशीय नियोजन, पायाभूत सुविधा नियोजन, नियोजन प्रस्तावांची तयारी / सुधारणा आणि इतर कायदेशीर नियोजनाच्या उद्देशांसाठी केला जाऊ शकतो.

VIII. प्रस्तावित जमिनीच्या मालकी, ताबा, हक्क, बोजे किंवा जमीनमालकांमधील वादासाठी NMRDA जबाबदार राहणार नाही.

IX. सादर केलेल्या माहितीची अचूकता व सत्यता यासाठी अर्जदार स्वतः जबाबदार राहील.

X. या Expression of Interest मध्ये सहभागी झाल्यामुळे संबंधित जमीन भविष्यातील कोणत्याही Town Planning Scheme मध्ये समाविष्ट केली जाईल असा कोणताही हक्क किंवा वैध अपेक्षा निर्माण होणार नाही.

**१९. प्राधिकरणाचा अधिकार.**

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (NMRDA) कोणतेही कारण न देता ही Expression of Interest पूर्णतः किंवा अंशतः सुधारित, बदल, मुदतवाढ, मागे घेणे किंवा रद्द करण्याचा अधिकार कोणत्याही टप्प्यावर राहील. पुढील नियोजन मुल्यांकनासाठी कोणत्याही प्रस्तावाचा विचार करण्याबाबत नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (NMRDA) निर्णय लागू कायद्याच्या अधीन राहून अंतिम राहील.

सादरीकरणासाठी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्तांचे खालील नमूद पत्त्यावरील कार्यालयात संपर्क करावा.

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA)
Survey No. ६४८/B-२, F. Plot No. ३११ (Part),
जैन मंदिराजवळ, राका कॉलनी,
नाशिक – ४२२००२.
दूरध्वनी : ०२५३-२९५९७८७
ई-मेल : nmrda.nsk@gmail.com
संकेतस्थळ : www.nashikmrda.in

जलज शर्मा, भा.प्र.से.
महानगर आयुक्त
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

परिशिष्ट – अ

Expression of Interest सादरीकरणाचा नमुना

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अर्जदार / अधिकृत प्रतिनिधीचे नाव | |
| २ | मोबाईल / ई-मेल | |
| ३ | गाव | |
| ४ | तालुका | |
| ५ | ग. नं. / सर्व्हे नं./ सि. स. नं. | |
| ६ | प्रस्तावित एकूण क्षेत्रफळ (एकर) | |
| ७ | सलग क्षेत्रफळ (एकर) | |
| ८ | एकूण जमीनमालकांची संख्या | |
| ९ | सहभागी जमीनमालकांची संख्या | |
| १० | सहभागी जमीनमालकांनी प्रतिनिधित्व केलेले क्षेत्रफळ | |
| ११ | प्रतिनिधित्व केलेल्या क्षेत्रफळाची टक्केवारी | |
| १२ | विद्यमान भू-वापर | |
| १३ | प्रस्तावित विकासाचा प्रकार | |
| १४ | रिंग रोडपासूनचे अंदाजे अंतर | |
| १५ | विद्यमान रस्ता जोडणी | |
| १६ | विद्यमान पायाभूत सुविधा | |
| १७ | विकासाची संक्षिप्त संकल्पना | |
| १८ | KML/KMZ सादर केले आहे होय / नाही | |
| १९ | जोडलेली कागदपत्रे | |
| २० | शेरा | |

<u>घोषणापत्र</u>

मी / आम्ही याद्वारे घोषित करतो / करते / करतो की, या Expression of Interest अंतर्गत सादर केलेली माहिती माझ्या/आमच्या माहितीनुसार खरी व अचूक आहे आणि वरील जमिनीच्या संदर्भात ही स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याचा मला/आम्हाला अधिकार आहे.

मला / आम्हाला हे मान्य आहे की, ही Expression of Interest सादर केल्यामुळे भू-वापरातील बदल, विकास परवानगी, Town Planning Scheme मध्ये समावेश किंवा इतर कोणतीही नियोजन मान्यता प्राप्त होणार नाही.

मी / आम्ही वरील नमूद जमीन नियोजित विकासासाठी आणि भविष्यात योग्य व कायदेशीरदृष्ट्या अनुमत असल्यास Town Planning Scheme किंवा इतर योग्य नियोजन हस्तक्षेपासाठी विचारात घेण्यास आपली इच्छा व्यक्त करीत आहे / आहोत.

नाव :- श्री. _____________

स्वाक्षरी : -__________

दिनांक :- __________

ठिकाण : -__________